## अर्ज निशाणी क्रमांक ४७ व ५० खालील आदेश

**( पारीत केलेला दिनांक ३०.९.२०२२)**

**०१**. प्रस्तूत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ यांनी त्यांच्याविरुध्द सरतपास **नि.क्र.४०** वर झालेला "**विना उलटतपास**" आदेश रद्द करण्यासाठी दाखल केला आहे.

**०२**. अर्जातील कारणे संयुक्तीक नाहीत. म्हणून वादीने हरकत घेतली.

**०३**. दोन्ही पक्षांतर्फे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

**०४**. प्रतिवादींनी वादीचा उलटतपास घेतला नाही, म्हणून त्यांच्याविरुध्द **"विना उलटतपास"** आदेश झाला आहे.

**०५.** दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादींना वादीचा उलटतपास घेण्याची संधी नाकारल्यास त्यांचे नुकसान होईल. प्रतिवादींना उलटतपास घेण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. वादीचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही.

**०६.** म्हणून प्रतिवादींविरुध्द **"विना उलटतपास"** झालेला आदेश रद्द करणे उचित होईल. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

### आदेश

१. अर्ज **नि.क्र.४७ व ५०** मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्रमांक ०१ व ०२ विरुध्द सरतपास **नि.क्र.४०** वर **"विना उलटतपास"** झालेला आदेश त्यांनी वादीला प्रत्येकी खर्च रक्कम रुपये **१००/-** देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2022.10.01 10:36:42 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**
**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**
**जिल्हा लातूर.**

**दिनांक :- ३०.०९.२०२२.**
**ठिकाण :- औसा.**